जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक ६८८ दिनांक - १३/०९/२०२३**

## आर्थिक गुन्हे शाखा पुणे शहर

## पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे सायंटिफिक एडस् टू इन्व्हेन्स्टिगेशन या टिम ला उत्कृष्ट सांघिक कामगिरी करिता सांघिक पारितोषिक मिळाले बाबत

दि.०१/०९/२०२३ ते दि.०९/०९/२०२३ रोजीपर्यंत राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. २, पुणे येथे महाराष्ट्र राज्य,पोलीस कर्तव्य मेळावा २०२३ चे आयोजन महाराष्ट्र पोलीस दलामार्फत करण्यात आले होते. सदर कर्तव्य मेळाव्याचे उद्‌घाटन सोहळयास पदम्‌विभुषन पुरस्कार भारत सरकार याने सन्मानित डॉ.रघुनाथ माशेलकर, भारतीय शास्त्रज्ञ, हे उपस्थित होते.

स्पर्धेमध्ये पुणे शहर पोलीस दलाचा संघ सहभागी झालेला होता. सायंटिफिक एडस् टू इन्व्हेन्स्टिगेशन या स्पर्धा प्रकारात श्री.नंदकुमार गायकवाड, पोलीस निरीक्षक,गुन्हे शाखा, पुणे शहर, श्रीमती ज्योती मेढे, सहा.पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर, श्रीमती चैताली गपट, पोलीस उप निरीक्षक, गुन्हे शाखा, पुणे शहर, श्री.आर.एच.घोलप, पोलीस हवालदार, खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर, श्रीमती उत्कर्षा वाघ, महिला पोलीस अंमलदार, गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी सहभाग घेतला होता. सायंटिफिक एडस् टू इन्व्हेन्स्टिगेशन या सदराखाली फिगंरप्रिंट या विषयात श्रीमती ज्योती मेढे, सहा.पोलीस निरीक्षक,आर्थिक गुन्हे शाखा,पुणे शहर यांनी रौप्य पदक तर फॉरेन्सिक सायन्स या विषयात श्रीमती चैताली गपट, पोलीस उप निरीक्षक, गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी रौप्य पदक, तसेच बॉम्ब शोधक व नाशक पथक, पुणे शहर मधील डॉग विराट व त्याचे हॅण्डलर पो.हवा.५८२४ शैलेश शिरतोडे, बी.डी.डी.एस.पुणे शहर यांना एक्सप्लोजिव्ह (स्निफर डॉग) या प्रकारात रौप्य पदक अशी वैयक्तिक पारितोषिके मिळली आहेत.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे सायंटिफिक एडस् टू इन्व्हेन्स्टिगेशन या टिम ला उत्कृष्ट सांघिक कामगिरी करिता सांघिक पारितोषिक देण्यात आले. सदर कार्यक्रमाचा सांगता समारंभ मा.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई श्री.रजनीश शेठ, यांचे उपस्थितीत पार पडला.




१८ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा-२०२३, पुणे
समारोप समारंभ
९ सप्टेंबर, २०२३
१६.३० वाजता
मा.श्री.
पोलीस महासंचालक
(MSPDM)
Scientific Aid to Investigation
पुणे शहर


१८ वा महाराष्ट्र राज्य पोलीस
मेळावा-२०२३, पुणे
९ सप्टेंबर, २०२३ रोजी
३० वाजता
पुणे शहर